Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

A

Paper-II
EDUCATION

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .....

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

JAN - 70218

Time Allowed : 1¼ Hours] **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.

   

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

Education
Paper II
शिक्षाशास्त्र
प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 75 Minutes] **[Maximum Marks : 100**

Note : This paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Modernization leads to ..... .

   (A) Democratization

   (B) Globalization

   (C) Industrialization

   (D) Urbanization

2. Gandhiji's basic principle of his life-philosophy was ..... .

   (A) Truth

   (B) Non-violence

   (C) Renunciation

   (D) Truth, non-violence

1. आधुनिकीकरणाची परिणती ..... यामधे होती.

   (A) लोकशाहीकरण

   (B) जागतिकीकरण

   (C) औद्योगिकीकरण

   (D) शहरीकरण

2. गांधीजींचा जीवन-दर्शनाचा आधार ..... आहे.

   (A) सत्य

   (B) अहिंसा

   (C) अपरिग्रह

   (D) सत्य, अहिंसा

3. "Religion and Education are ways of upasna." This thought is related to ..... philosophy.

(A) Buddhism

(B) Jainism

(C) Spiritualism

(D) Naturalism

4. How was the relation of a teacher with his student according to Swami Vivekananda ?

(A) Philosopher

(B) Friend

(C) Guide

(D) Parent

5. 'Knowledge is Virtue', this statement with reference to ..... .

(A) Spiritualism

(B) Idealism

(C) Naturalism

(D) Pragmatism

3. ''धर्म व शिक्षण हे उपासनेचे मार्ग आहेत.'' ..... तत्त्वज्ञानाशी निगडित आहे.

(A) बौद्ध

(B) जैन

(C) अध्यात्मवादी

(D) निसर्गवादी

4. विद्यार्थ्यासाठी शिक्षकाची भूमिका विवेकानंद यांच्यानुसार कशी असावी ?

(A) तत्त्वज्ञ

(B) मित्र/बंधु

(C) पथप्रदर्शक

(D) पालक

5. 'ज्ञान म्हणजे सद्‌गुण' हे विधान ..... तत्त्वज्ञानाशी संबंधित आहे.

(A) अध्यात्मवाद

(B) आदर्शवाद

(C) निसर्गवाद

(D) कार्यवाद

6. Rabindranath Tagore is *not* associated with ..... .

(A) Vishwabharti

(B) National Anthem

(C) Nobel Prize

(D) Vande Matram

7. One of the main truths of Buddhism is ..... .

(A) Freedom from Sin

(B) Freedom from Suffering

(C) Freedom from Karma

(D) Freedom from Anger

8. Importance of physical environment is given in ..... .

(A) Realism

(B) Naturalism

(C) Spiritualism

(D) Idealism

6. रवीन्द्रनाथ टॅगोर यांच्याशी संबंधित **नाही** :

(A) विश्वभारती

(B) राष्ट्रगान

(C) नोबेल-पुरस्कार

(D) वंदेमातरम्

7. बौद्ध तत्त्वज्ञानामधील सर्वात प्रमुख सत्य ..... आहे.

(A) पापापासून मुक्ती

(B) दु:खापासून मुक्ती

(C) कर्मापासून मुक्ती

(D) क्रोधापासून मुक्ती

8. भौतिक पर्यावरणाला प्राधान्य ..... यातील दिला आहे.

(A) वास्तववाद

(B) निसर्गवाद

(C) अध्यात्मवाद

(D) आदर्शवाद

9. Integration of spiritualism and science in education was propounded by ..... .

(A) Sri Aurobindo

(B) Swami Vivekananda

(C) J. Krishnamurthy

(D) Mahatma Gandhi

10. 'I think, therefore, I am', is the basic principle of ..... .

(A) Realism

(B) Marxism

(C) Existentialism

(D) Logical empiricism

11. In 1921 'Viswabharti' was established by ..... .

(A) Mahatma Gandhi

(B) Vinoba Bhave

(C) Rabindranath Tagore

(D) Vivekananda

9. 'अध्यात्म व विज्ञान यांचे शिक्षणाचे एकात्मीकरण' हा विचार ..... यांनी मांडला

(A) अरविंदो

(B) स्वामी विवेकानंद

(C) जे. कृष्णमूर्ती

(D) महात्मा गांधी

10. 'मी विचार करतो, म्हणून मी आहे' हे पायाभूत तत्त्व या तत्त्वज्ञानाचे आहे :

(A) वास्तववाद

(B) मार्क्सवाद

(C) अस्तित्ववाद

(D) तार्किक प्रत्यक्षार्थवाद

11. विश्वभारतीची स्थापना 1921 वर्षी ..... यांनी केली.

(A) महात्मा गाँधी

(B) विनोबा भावे

(C) रवींद्रनाथ टॅगोर

(D) विवेकानंद

12. Pragmatism advocates ..... .

(A) Learning by doing

(B) Inductive-deductive method

(C) Lecture method

(D) Problem solving method

13. Women Education was discouraged by ..... .

(A) Plato

(B) Dewey

(C) Rousseau

(D) Erasmus

14. Socialization is the main aim of education at ..... level.

(A) Primary

(B) Pre-primary

(C) Secondary

(D) Higher-Secondary

12. कार्यवाद ..... चा पुरस्कार करतो.

(A) कृतीतून शिक्षण

(B) उद्‌गामी-अनुगामी पद्धती

(C) व्याख्यान पद्धती

(D) समस्या-निराकरण पद्धती

13. स्त्री शिक्षणाला ..... यांनी परावृत्त केले.

(A) प्लेटो

(B) ड्यूई

(C) रूसो

(D) इरासमस

14. सामाजिकीकरण हा शिक्षणाचा प्रमुख हेतू ..... स्तरावरील शिक्षणाचा असतो.

(A) प्राथमिक

(B) पूर्व-प्राथमिक

(C) माध्यमिक

(D) उच्च-माध्यमिक

15. The family imparts education to the child ..... .

(A) Formally

(B) Informally

(C) Deliberately

(D) Regularly

16. Socialisation is a process of ..... .

(A) Participation in the school ceremonies

(B) Challenging the rules and norms of social life

(C) Learning social habits, attitude and values

(D) Knowing the achivements of fore-fathers

17. The role of education with reference to culture is ..... .

(A) Preservation

(B) Conservation

(C) Both preservation and promotion

(D) Modernisation

15. कुटुंब मुलांना खालीलप्रकारे शिक्षण देते ..... .

(A) औपचारिकपणे

(B) अनौपचारिकपणे

(C) हेतूपुरस्सरपणे

(D) नियमितपणे

16. सामाजिकीकरण ही ..... प्रक्रिया आहे.

(A) सामाजिक समारंभात सहभागी होण्याची

(B) सामाजिक जीवनाचे नियम व मानके यांना आव्हान देण्याची

(C) सामाजिक सवयी, अभिवृत्ती व मूल्ये यांच्या अध्ययनाची

(D) पूर्वजांच्या महत् कृत्याची माहिती होण्याची

17. संस्कृतीच्या संदर्भात शिक्षणाची भूमिका ..... आहे.

(A) जतन

(B) संवर्धन

(C) जतन व प्रोत्साहन दोन्ही

(D) आधुनिकीकरण

18. ..... is not social interaction.

(A) Communication among members of a social group

(B) Communication between two or more social groups

(C) Communication between two individuals

(D) Analysis of social process in groups

19. Which of the following is an informal agency of education ?

(A) Religious institution

(B) Anganwadi

(C) Adult education centre

(D) Night school

18. ..... ही सामाजिक आंतरक्रिया नाही.

(A) एका सामाजिक गटातील सदस्यांमधील संप्रेषण

(B) दोन किंवा अधिक सामाजिक गटांमधील संप्रेषण

(C) व्यक्ती-व्यक्तीमधील संप्रेषण

(D) गटामधील सामाजिक प्रक्रियांचे विश्लेषण

19. खालीलपैकी कोणते अनौपचारिक शिक्षणाचे साधन आहे ?

(A) धार्मिक संस्था

(B) अंगणवाडी

(C) प्रौढ शिक्षण केंद्र

(D) रात्रशाळा

20. A teacher introduces culture of different communities to his students, here he is performing the role as a ..... .

(A) Promoter

(B) Conservator

(C) Communicator

(D) Creator

21. Who wrote the book "School and Society" ?

(A) Auguste Comte

(B) John Dewey

(C) Emil Durkheim

(D) Robert Merton

22. Urbanization does *not* lead to ..... .

(A) Development of industries

(B) Increased opportunities for varied job

(C) Increase in thinking level of individual

(D) Increase in economic status of individual

20. शिक्षक विद्यार्थ्यांना विविध संस्कृतीची ओळख करून देतात, येथे शिक्षक ..... म्हणून भूमिका बजावतात.

(A) प्रवर्तक

(B) संरक्षक

(C) संप्रेषक

(D) निर्माता

21. 'स्कूल अँड सोसायटी' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?

(A) ऑगस्त काँत

(B) जॉन ड्यूई

(C) एमिल दरखिम

(D) रॉबर्ट मर्टोन

22. शहरीकरणामुळे पुढील गोष्ट घडून येत **नाही** :

(A) औद्योगिक विकास

(B) विविध रोजगाराच्या उपलब्धतेत वृद्धी

(C) व्यक्तीच्या वैचारिक स्तरात वृद्धी

(D) व्यक्तीच्या आर्थिक स्थितीत वृद्धी

23. The most dominant impediment for modernisation is ..... .

(A) The caste system

(B) The religious system

(C) The family system

(D) The marriage system

24. The main constraint to social change in India is ..... .

(A) Non-flexibility

(B) International policy

(C) Non-acceptance of novelty

(D) Democracy

25. Promotion of an employee to higher post due to acquisition of qualification is an example of ..... .

(A) Vertical mobility

(B) Diagonal mobility

(C) Horizontal mobility

(D) Circular mobility

23. आधुनिकीकरणातील सर्वात मोठा अडथळा ..... आहे.

(A) जातिप्रथा

(B) धर्मप्रथा

(C) कुटुंबप्रथा

(D) विवाहप्रथा

24. भारतामधील सामाजिक परिवर्तनाचा प्रमुख अडथळा ..... आहे.

(A) ताठरपणा

(B) आंतरराष्ट्रीय धोरण

(C) नाविण्याचा अस्वीकार

(D) लोकशाही

25. उच्च पात्रता प्राप्त केल्यामुळे एखाद्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती होते हे .....चे उदाहरण आहे.

(A) उर्ध्वगामी गतिशीलता

(B) कर्णरेखीय गतिशीलता

(C) समांतर (Horizontal) गतिशीलता

(D) चक्रीय गतिशीलता

26. ..... was the first person to give psychological base for education.

(A) Stanley Hall

(B) Alfred Binnet

(C) John Locke

(D) Johan Herbert

27. According to Jean Piaget, the process of cognitive development is ..... .

(A) assimilation → accommodation → equilibration → reproductive assimilation → unequilibration

(B) accommodation → equilibration → assimilation → reproductive → assimilation → unequilibration

(C) assimilation → reproductive assimilation → accommodation → equilibration → unequilibration

(D) equilibration → assimilation → accommodation → reproductive assimilation → unequilibration

26. शिक्षणशास्त्रास मानसशास्त्रीय पाया प्रथमत: ..... यांनी दिला.

(A) स्टेनले हॉल

(B) अल्फ्रेड बीने

(C) जॉन लॉक

(D) जॉहन हरबर्ट

27. जीन पियाजे यांच्या मते, ... ही बोधात्मक विकासाची प्रक्रिया आहे.

(A) सात्मीकरण → समावेशन → समतोलन → पुनरावर्ती सात्मीकरण → असमतोलन

(B) समावेशन → समतोलन → सात्मीकरण → पुनरावर्ती सात्मीकरण → असमतोलन

(C) सात्मीकरण → पुनरावर्ती सात्मीकरण → समावेशन → समतोलन → असमतोलन

(D) समतोलन → सात्मीकरण → समावेशन → पुनरावर्ती सात्मीकरण → असमतोलन

28. A poet sees one incidence and after some months or years writes the poem regarding this incidence. This period may be called ..... stage of creativity.

(A) Preparation

(B) Incubation

(C) Illumination

(D) Verification

29. According to Gardner's multiple intelligence theory, art of photography is the example of ..... type of intelligence.

(A) Visual

(B) Bodily

(C) Logical

(D) Musical

28. एका कवीने एक प्रसंग पाहिला व त्यानंतर काही महिने किंवा वर्षानंतर त्याने त्या प्रसंगावर कविता लिहिली. या कालावधीला सर्जनशीलतेची ..... पायरी म्हणतात.

(A) पूर्वतयारी

(B) उबविणे

(C) प्रकाशिकीकरण

(D) पडताळा

29. गार्डनरच्या बहुविध बुद्धिमत्ता उपपत्तीनुसार छायाचित्रण कला ही ..... बुद्धिमत्ता प्रकाराचे उदाहरण आहे.

(A) अवकाशविषयक

(B) शरीरविषयक

(C) तार्किक

(D) संगीतविषयक

30. The Sternberg identified ..... steps for information processing theory of intelligence.

(A) encoding → inferring → mapping → application → response → justification

(B) encoding → inferring → mapping → application → justification → response

(C) encoding → mapping → inferring → application → response → justification

(D) encoding → mapping → application → inferring → response → justification

30. बुद्धिमत्तेच्या माहिती प्रक्रियाकरण उपपत्तीत स्टर्नबर्ग यांनी ..... पायऱ्या मांडल्या.

(A) निसांकेतिकीकरण → अनुमान → आरेखन → उपयोजन → प्रतिसाद → समर्थन

(B) निसांकेतिकीकरण → अनुमान → आरेखन → उपयोजन → समर्थन → प्रतिसाद

(C) निसांकेतिकीकरण → आरेखन → अनुमान → उपयोजन → प्रतिसाद → समर्थन

(D) निसांकेतिकीकरण → आरेखन → उपयोजन → अनुमान → प्रतिसाद → समर्थन

31. One child establishes relationship between two or more concepts and directed the relations continuously. According to Gagne's hierarchical theory of learning, this activity belongs to ..... stage.

(A) Multiple discrimination

(B) Concept learning

(C) Learning of principles

(D) Problem solving

32. Kurt Lewin used the concept of ..... to explain person's life space.

(A) Geometry

(B) Topology

(C) Psychology

(D) Vector

31. एक मुल दोन किंवा अधिक संकल्पनांमध्ये संबंध प्रस्थापित करते व संबंध सातत्यपूर्ण दर्शविते. गॅग्नेच्या श्रेणीबद्ध अध्ययन उपपत्तीनुसार ही कृती ..... स्तराशी निगडित आहे.

(A) गुणित भेदाभेदन

(B) संकल्पना अध्ययन

(C) तत्त्वांचे अध्ययन

(D) समस्या निराकरण

32. व्यक्तीचे जीवनक्षेत्र ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी कर्ट लेविन यांनी ..... चा वापर केला.

(A) भूमिती

(B) टॉपॉलॉजी

(C) मानसशास्त्र

(D) सदिश राशी

33. According to Allport's theory of personality, sincerity trait is related to ..... .

(A) Primary traits

(B) Secondary traits

(C) Cardinal traits

(D) Central traits

34. The characteristics of personality of sonal is pessimistic, unsociable and reserved. Then according to Sheldon's classification she is included in ..... personality type.

(A) Endomorphic

(B) Mesomorphic

(C) Ectomorphic

(D) Asthenic

33. ऑलपोर्टच्या व्यक्तिमत्त्व उपपत्तीनुसार 'प्रमाणिकपणा' हा गुणविशेष ..... शी संबंधित आहे.

(A) प्राथमिक गुणविशेष

(B) दुय्यम गुणविशेष

(C) प्रधान गुणविशेष

(D) केंद्रीय गुणविशेष

34. सोनलच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये ही निराशावादी, समाजविन्मुख व आत्मसंकोची अशी आहेत. तर ती शेल्डनच्या वर्गीकरणानुसार व्यक्तिमत्त्वाच्या ..... प्रकारात समाविष्ट आहे.

(A) स्थूल प्रकृती

(B) बोधेसूद प्रकृती

(C) शेलाटी प्रकृती

(D) अस्थी प्रधान

35. Anita hesitates to talk to strangers. According to Eyesenck's view of personality Anita's behaviour falls in ..... .

(A) introversion (type)

(B) trait

(C) habitual response

(D) specific response

36. When Anil get failure in sport competition and says 'i could not get sufficient time', He is satisfying himself. This is an example of ..... defence mechanism.

(A) Repression

(B) Regression

(C) Projection

(D) Rationalization

35. अनितास नवीन व्यक्तिबरोबर बोलण्यास संकोच वाटतो. अनिताचे हे वर्तन आयसेन्कच्या व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टिकोनातून ..... पातळीत आहे.

(A) अंतर्मुखता वर्ग

(B) गुणतत्त्व

(C) सवय प्रतिसाद

(D) विशिष्ट प्रतिसाद

36. अनिलला क्रीडा स्पर्धेत अपयश आल्यानंतर तो 'मला पुरेसा वेळ मिळाला नव्हता' असे सांगून स्वत:चे समाधान करून घेतो. हे ..... संरक्षण यंत्रणेचे उदाहरण आहे.

(A) दमन

(B) परागमन

(C) प्रक्षेपक

(D) समर्थन

37. ..... is not a characteristic of integrated personality.

(A) Good health

(B) Co-operative nature

(C) Endearing behaviour

(D) Aggression

38. In experimental research before starting the data analysis the researcher should ensure the data with ..... .

(A) Graphical presentation

(B) 'F' test

(C) 't-test

(D) Normality of data

37. एकात्म व्यक्तिमत्त्वाचे ..... हे वैशिष्ट नाही.

(A) चांगले आरोग्य

(B) सहकार्य वृत्ती

(C) प्रेमळ वर्तन

(D) आक्रमकता

38. प्रायोगिक संशोधनामध्ये, माहिती विश्लेषणाच्या अगोदर संशोधकाने माहिती विषयी ..... संदर्भात खात्री करून घेतली पाहिजे.

(A) आरेखित सादरीकरण

(B) F-कसोटी

(C) t-कसोटी

(D) माहितीची (data) प्रसामान्यता

39. Tetrachoric coefficient of correlation is appropriate when ..... .

(A) one variable is having natural dichotomy and other is not continuous

(B) both the variables are having artificial dichotomy

(C) one variable is having natural dichotomy and other is continuous

(D) one variable is having natural dichotomy and other is having artificial dichotomy

40. In experimental research ..... variable is an outcome.

(A) Independent

(B) Dependent

(C) Extraneous

(D) Controlled

39. जेंव्हा '.....' तेंव्हा चतुष्खंडात्मक सहसंबंध सहगुणक समर्पक ठरतो.

(A) एक चल नैसर्गिकपणे दोन भागात विभागले असेल व दुसरे खंडित असेल

(B) दोन्हीही चले कृत्रिमपणे दोन भागात विभागली असतील

(C) एक चल नैसर्गिकपणे दोन भागात विभागले असेल व दुसरे अखंडित असेल

(D) चल चल नैसर्गिकपणे दोन भागात विभागले असेल व दुसरे कृत्रिमपणे दोन भागात विभागले असेल

40. प्रायोगिक संशोधनात ..... चल ही निष्पत्ती होय.

(A) स्वाश्रयी

(B) आश्रयी

(C) बहिस्थ

(D) नियंत्रित

41. Which of the following sampling techniques is non-probabilistic ?

(A) Stratified

(B) Cluster

(C) Snowball

(D) Systematic

42. Data collection by visiting places like Red Fort, Shalimar Garden, Industries and historical places is referred to be ..... data.

(A) Secondary

(B) Industrial

(C) Historical

(D) Primary

43. A sample unit is said to be good if the sample is ..... .

(A) Well educated to provide enough data

(B) Listed in the programmes of educational institutions

(C) Drawn from a target group as represented in the objectives of the study

(D) Easily accessible to collect data

41. खालीलपैकी कोणते असंभाव्यता आधारित नमुनानिवड तंत्र आहे ?

(A) वर्गीकृत

(B) गुच्छ

(C) स्नोबॉल

(D) नियमबद्ध

42. रेडफोर्ट, शालिमार गार्डन, उद्योग संस्था व ऐतिहासिक स्थळे येथून मिळविलेली माहिती (data) ही ..... होय.

(A) दुय्यम

(B) औद्योगिक

(C) ऐतिहासिक

(D) प्राथमिक

43. एखाद्या नमुना एककास चांगला नमुना म्हणता येईल जर तो नमुना '.....'.

(A) पुरेशी माहिती (data) देण्याइतका सुशिक्षित असेल

(B) शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्रमांच्या यादीतील असेल

(C) संशोधनाच्या उद्दिष्टांमध्ये निर्देशीत लक्ष्यगटांमधून असेल

(D) माहिती (data) संकलनासाठी सहजसाध्य असेल

44. A researcher proposes that the boys and girls perform equally well in mechanical aptitude test. This is ..... hypothesis.

(A) Statistical

(B) Research

(C) Null

(D) Operational

45. The formula of Chi-square test is ..... .

(A) $\chi^2 = \sum\left(\frac{(f_o + f_e)^2}{f_o}\right)$

(B) $\chi^2 = \left(\frac{f_e - f_o}{f_e}\right)^2$

(C) $\chi^2 = \sum\left(\frac{f_e - f_o}{f_e}\right)^2$

(D) $\chi^2 = \sum\frac{(f_o - f_e)^2}{f_e}$

44. एक संशोधक असे मांडतो कि, 'यांत्रिकी अभिक्षमता कसोटीत मुले व मुली एकसारखेच कार्यमान (performance) दर्शवतात' ही .....परिकल्पना आहे.

(A) सांख्यिकी

(B) संशोधन

(C) शून्य

(D) कार्यात्मक

45. काय-स्क्वेअर (χ^2) कसोटीचे सूत्र ..... हे आहे.

(A) $\chi^2 = \sum\left(\frac{(f_o + f_e)^2}{f_o}\right)$

(B) $\chi^2 = \left(\frac{f_e - f_o}{f_e}\right)^2$

(C) $\chi^2 = \sum\left(\frac{f_e - f_o}{f_e}\right)^2$

(D) $\chi^2 = \sum\frac{(f_o - f_e)^2}{f_e}$

46. Internal criticism in historical research establishes ..... of data.

(A) Accuracy

(B) Trustworthiness

(C) Utility

(D) Authenticity

47. A researcher was interested in collecting data from teacher educators. He visited the teacher education conference and collected the data from those who were present. This sampling technique is ..... sampling.

(A) Purposive

(B) Instant

(C) Quota

(D) Incidental

46. ऐतिहासिक संशोधनात अंतर्गत मिमांसा, माहितीची (data) ..... प्रस्थापित करते.

(A) अचूकता

(B) विश्वासार्हता

(C) उपयुक्तता

(D) प्रामाण्यता

47. शिक्षक-शिक्षण परिषदेस भेट देणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांकडून माहिती (data) संकलित करण्यासाठी एक संशोधक इच्छुक होता. त्याप्रमाणे त्याने माहितीचे (data) संकलन केले. या नमुनानिवड तंत्रास ..... नमुनानिवड तंत्र म्हणतात.

(A) सहेतूक

(B) तात्कालिक

(C) निर्दिष्टांश

(D) प्रासंगिक

48. Theoretical questions in any discipline are enquired through ..... type of research.

(A) Applied

(B) Fundamental

(C) Action

(D) Historical

49. Student 'A' has achieved twice that of student 'B' and thrice that of student 'C'. The measurement presented in this case is on ..... scale.

(A) Nominal

(B) Ordinal

(C) Interval

(D) Ratio

50. 'A' group has M = 5 and N = 20

'B' group has M = 20 and N = 5

The combined mean for A and B groups will be ..... .

(A) 12.5

(B) 25

(C) 8

(D) 1.8

48. कोणत्याही विद्याशाखेतील सैद्धांतिक प्रश्नांची उत्तरे ..... प्रकारच्या संशोधनातून मिळवली जातात.

(A) उपयोजित

(B) मूलभूत

(C) कृती

(D) ऐतिहासिक

49. 'A' विद्यार्थ्याने 'B' विद्यार्थ्यापेक्षा दुप्पट संपादणूक प्राप्त केली आणि 'C' विद्यार्थ्यापेक्षा तीन पट संपादणूक प्राप्त केली. तर हे मापन ..... शलाकेवरील (scale) मापन आहे.

(A) नामांकन

(B) क्रमांकन

(C) अंतर

(D) गुणोत्तर

50. 'A' गटासाठी M = 5 आणि N = 20

'B' गटासाठी M = 20 आणि N = 5

तर A आणि B गटाचे संयुक्त मध्यमान ..... असेल.

(A) 12.5

(B) 25

(C) 8

(D) 1.8

ROUGH WORK